# उत्तरे

# माऊली मराठी व्याकरण - ३

## १. भाषा

**क.** **राज्य** - गुजरात, महाराष्ट्र, पंजाब, बंगाल

**भाषा** - गुजराती, मराठी, पंजाबी, बंगाली

**ख.** राजस्थानी मराठी कश्मीरी जापानी

**ग.** गुजराती पंजाबी हिंदी राजस्थानी मराठी

उडिया मणिपुरी मलयालम तेलुगु तमिल

## २. वर्ण

**क.** **उदाहरण** - अमिताभ - अ + म् + इ + त् + आ + भ् + अ

१. रमेश - र् + अ + म् + ए + श् + अ

२. सागर - स् + आ + ग् + अ + र् + अ

३. मंदार - म् + अं + द् + आ + र

**ख.** (ळे, ला, लि, न, रू, ढा, ब, डू , गु , ली , के , पे )

**फूल** - गुलाब, लिली **फळ** - केळे, पेरू **मिठाई** - लाडू , पेढा

**ग.** **स्वर** - ओ, अ, ऋ, ई, ऊ **व्यंजन** - च, म, त, श, र

## ३. मात्रा

**क.** १. कृ २. पे ३. खि ४. तो ५. फू ६. मा

**ख.** १. ई ( ी ) २. आ ( ा ) ३. ऋ ( ृ ) ४. उ ( ु ) ५. ऊ ( ू )

**ग.** १. क् + ए + ळ् + ई २. स् + उ + र् + ई ३. प् + आ + लक ४. क् + ऋ + ष्णाचे

**घ.** १. राम चांगला मुलगा आहे. २. मोर नाचत आहे. ३. रमा सायकल चालवते.

४. जिलेबी गोड आहे. ५. राम वनात गेला.

## ४. नाम

**क.** विद्यार्थ्यांनी स्वत: हा प्रश्न सोडवावा.

**ख.** १. सूर्य २. पाण्या ३. झी-मराठी ४. माऊली छान-छान गोष्टी ५. चेंडू

६. अंगण ७. गोडवा

**ग.** १. राधा - विशेषनाम २. पक्षी - सामान्यनाम

३. डोंगर - सामान्यनाम ४. आंबा - विशेषनाम


५. राजा - सामान्यनाम ६. राम - विशेषनाम

७. गावकरी - सामान्यनाम

**घ.** १. तारुण्य २. शहाणपणा ३. गुलामगिरी ४. निश्चयी ५. धूर्तपणा ६. सौंदर्य

# ५. लिंग

**क.**



**ख.** **पुल्लिंग** – काका, नोकर, बैल, शिक्षक **स्त्रीलिंग** – आजी, बकरी, मामी

**ग.** १. लेखिका पुस्तक लिहित आहे. २. माकडीण केळे खात आहे. ३. मुलगा सुंदर दिसत आहे.
४. वाघीण शिकार करत आहे. ५. धोबीण कपडे धूत आहे. ६. सरोवरात हंसीण पोहत आहे.
७. वधू मंडपात आली. ८. माझी शेजारीण चांगली आहे.

**घ.** १. बहीण २. बैल ३. मुलगी ४. आई ५. विदुषी
६. राणी ७. माळीण ८. माकडीण

# ६. वचन

१. झाडावर फुले होती. २. आकाशात पतंग उडत आहेत. ३. इंग्रजांनी गोळ्या झाडल्या.
४. घरावर पाखरे बसली होती. ५. वाऱ्यामुळे पान उडाले. ६. दारे बंद करा. ७. गावात नागमोडी वाटा आहेत.

**क.** १. अनेकवचन २. एकवचन ३. अनेकवचन ४. अनेकवचन ५. अनेकवचन ६. एकवचन

**ख.** १. घोडे २. रेडे ३. आंबे ४. भाकऱ्या ५. रताळी ६. शीत ७. पिल्ले
८. माणसे ९. गाडगे १०. कागद ११. स्त्रिया १२. चुका १३. भिंती १४. काठ्या
१५. फोटो १६. भाले १७. लाडू १८. जाती १९. विटा २०. जावा

# ७. सर्वनाम

**क.** १. कोठे – प्रश्नार्थक सर्वनाम २. त्यांना – दर्शक सर्वनाम ३. मी – पुरुषवाचक सर्वनाम
४. काय – प्रश्नार्थक सर्वनाम ५. ते – दर्शक सर्वनाम

**ख.** १. त्याच्या – राजला त्याच्या बाबांनी खेळाचे महत्व पटवून दिले. २. ही – ही बाहुली माझी आहे.
३. त्याने – त्याने सागरला अभ्यासात खूप मदत केली. ४. ते – ते शलाकाचे काका आहेत.
५. कोण – गावाला कोण गेला होता?

**ग.** १. ज्याने – संबंधी सर्वनाम २. आपण – पुरुषवाचक सर्वनाम
३. आपण – पुरुषवाचक सर्वनाम ४. ही – दर्शक सर्वनाम ५. कोण – प्रश्नार्थक सर्वनाम

**घ.** १. तुम्ही २. ते ३. आपण ४. तो ५. आपण

## ८. विशेषण

★ १. लहान २. हुशार ३. चार ४. शेकडो ५. चतुर ६. कठोर

★ १. दहा – उमेश **दहा** वर्षांचा आहे. २. नव्या – प्रकल्प कार्य करताना गणेशला खूप **नव्या** कल्पना सुचल्या.

३. मूकबधीर – वनीता **मूकबधीरां**च्या शाळेत शिक्षिका आहे. ४. हुशार – राधा **हुशार** मुलगी आहे.

५. उत्तम – रोज व्यायाम केल्यामुळे सुलोचनाच्या प्रकृतीत **उत्तम** सुधारणा झाली.

**क.** १. सुंदर, मंद २. पाच, दहा ३. हिरवा, पिवळे

**ख.** विद्यार्थ्यांनी स्वत:संबंधी माहिती लिहावी.

**ग.** १. आंबा २. बाहुला ३. मुले ४. पेरू ५. आवाज ६. शालू ७. कारले

## ९. क्रियापद

**क.** १. खाणे २. गाणे ३. खेळणे ४. ऐकणे ५. नाचणे ६. झोके घेणे

**ख.** १. घालत आहे. २. लावत आहे. ३. जात आहे. ४. खात नाही. ५. पैसे दिले.

**ग.** १. पाहत २. शिकवत ३. बसली ४. उघडत ५. बनवीत ६. खेळतो ७. बोलव

## १०. शुद्धलेखन

**क.** १. गुन्हा २. संकट ३. झोपडी ४. शक्ती ५. बारीक

६. प्रेमळ ७. कहानी ८. सर्वत्र ९. कंजूस १०. किनारा

## ११. समानार्थी शब्द

**क.** १. सुमन, कुसुम २. रवी, दिनकर ३. हस्त, कर

**ख.** १. हर्ष २. माता ३. सुधा ४. थोर ५. मनोहर

६. संशय ७. ताकद ८. शर ९. अरण्य १०. घोडा – तुरंग

**ग.** १. नट २. माफी ३. मनीषा ४. गायक ५. गड, दुर्ग

६. मोठा दगड, पाषाण ७. निशाण ८. नूतन ९. रास १०. माया

**घ.** १. ती **तरुणी** सुंदर आहे. २. तो मुलगा **पंडित** आहे. ३. शिकारी **रानात** शिकार करतो.

४. मला खूप **क्षुधा** लागली. ५. शाळेजवळ **तलाव** आहे.

## १२.विरुद्धार्थी शब्द

**क.** १. अशक्त २. निरुपयोगी ३. अवकृपा ४. निंदा ५. अंत ६. पिछाडी

७. स्थिर ८. अधर्म ९. अधीर १०. अनुचित ११. दुरावा १२. विषम

**ख.** १. लवकर २. अनादर ३. भिन्न ४. मावळतो ५. अनेक

**ग.** १. अधर्म २. अपयश ३. कडू ४. उतार ५. परकीय

**घ.** १. राधा आज उदास नव्हती. २. राम बारीक नाही. ३. ती कामात अयशस्वी झाली नाही.

४. जयने खूप पैसे जमवले नाहीत.

## १३. शब्दसमूहासाठी एक शब्द

**क.** १. अनाथ २. कार्यरत ३. घोकंपट्टी

**ख.** १. सराव २. जिवलग ३. हिरा ४. मृगनयना ५. अल्पजीवी

६. हितचिंतक ७. सत्यवादी ८. प्रकल्पकाळ

**ग.** १. वक्ता २. पहाट ३. भाट ४. चिंतामणी ५. शाश्वत

६. लकेर ७. रत्नजडीत ८. श्रोता

## १४. म्हणी

**क.** १. मूर्खाला कितीही उपदेश केला तरी त्याचा उपयोग होत नाही. २. मूर्खाला कितीही उपदेश केला तरी त्याचा उपयोग होत नसतो.

३. पक्का निश्चय करणे. ४. आपले काम होईपर्यंत गोड बोलणे. ५. खूप मेहनत करून थोडेसे यश मिळणे.

## १५. दिनदर्शिका आणि सण

**क.** १. शनिवार, शुक्रवार २. Thursday ३. जून ४. ऑगस्ट ५. दोन ६. गांधी जयंती

**ख.** १. रंगाचा पर्व २. श्रीकृष्णाचा जन्मदिवस ३. प्रजासत्ताक दिन

४. खिश्चन लोकांचा सण ५. भाऊ बहिणीच्या प्रेमाचा सण

**ग.** १. चूक २. बरोबर ३. चूक ४. चूक ५. चूक

६. चूक ७. बरोबर

## १६. अंकलेखन

क. १. एकोणवीस २. ५४ ३. पंधरा ४. बारा ५. एकोणतीस ६. सात

ख.

| क्र | इंग्रजी अंक | मराठी अंक | मराठी शब्द |
|---|---|---|---|
| क. | 49 | ४९ | एकोणपन्नास |
| ख. | 18 | १८ | अठरा |
| ग. | 29 | २९ | एकोणतीस |
| घ. | 11 | ११ | अकरा |
| ङ. | 23 | २३ | तेवीस |
| च. | 34 | ३४ | चौतीस |
| छ. | 45 | ४५ | पंचेचाळीस |
| ज. | 6 | ६ | सहा |
| झ. | 28 | २८ | अठ्ठावीस |
| ञ. | 19 | १९ | एकोणवीस |
| त. | 21 | २१ | एकवीस |
| थ. | 41 | ४१ | एकेचाळीस |
| द. | 43 | ४३ | त्रेचाळीस |

## १८. उतारा लेखन

**क.** **'मानवता' हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे ......................... जाणीव नसे।"**

१. 'मानवतेचे पूजक व्हा!' असा संदेश सर्व धर्माच्या संस्थापकांनी दिला आहे.

२. सारी प्राणीमात्रा ही परमेश्वराची लेकरे आहेत. त्यांच्या सेवेतून परमेश्वराची पूजा साधली जाते हे महान तत्व ज्यांनी आचरणात आणले ते अजरामर होतात.

३. ज्याचा कधीच विनाश होत नाही त्याला अजरामर असे म्हणतात किंवा ती गोष्ट अजरामर असते.

४. यांत्रिक युगात माणसातील माणुसकी हरवली आहे.

५. तुकाराम महाराजांनी परखड शब्दात ''कासिया पाषाण, पूजिती पितळ, खरा धर्म तो जाणीला नसे।'' असे म्हटले आहे.

**ख. ज्याला जीवनातील विसंगतीची जाण असते,.........................................मात करता येते.**

१. विनोद निर्माण करण्यासाठी जीवनातील विसंगतीची जाण, सौंदर्याचे भान आणि सुसंस्कृत प्रगल्भ मनाचा समाज अस्तित्वात यावा, अशी तळमळ ज्याच्या जवळ असते तोच चांगला विनोद निर्माण करू शकतो म्हणजेच विनोद निर्माण करण्यासाठी विनोदबुद्धीची आवश्यकता आहे.

२. विनोद हे दुधारी शस्त्र आहे असे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी म्हटले आहे.

३. विनोदकाराला व्यक्ती व समाज दोषमुक्त होऊन सुंदर व सुसंस्कृत करावयाचा असतो.

४. मानवनिर्मित दोष नाहिसे करण्यासाठी ते दोषच विनोदाद्वारे हास्यविषय केले पाहिजेत.

५. चांगला विनोद हा समोर धरलेल्या आरशासारखा असतो.

**ग. भोला नावाचा एक गुराखी होता.......................................................... प्राण गमवावे लागले.**

१. भोला मेंढ्या घेऊन नेहमी गावाबाहेरच्या रानात जात असे.

२. भोलाला आपण जोरजोरात 'वाघ आला, वाघ आला' असे ओरडावे अशी कल्पना सुचली.

३. भोलाचा वाघ आला, वाघ आला हा आवाज ऐकून शेतकरी धावू लागला.

४. एके दिवशी मेंढ्या चरत असताना भोल्याला झुडपाच्या मागे काहीतरी हलल्यासारखे वाटले . त्याने पाहिले तर खरोखरच वाघ होता तो त्याच्या दिशेनेच येत होता; म्हणून भोला घाबरला.

५. भोला वाघ आला, वाघ आला असे ओरडून शेतकऱ्यांना फसवत असे. एके दिवशी मेंढ्या चरत असताना भोल्याला झुडपाच्या मागेकाहीतरी हलल्यासारखे वाटले. त्याने पाहिले तर खरोखरच वाघ होता तो त्याच्या दिशेनेच येत होता; म्हणून भोला घाबरला व वाघ आला, वाघ आला असे ओरडू लागला; पण गावकऱ्यांनी दुर्लक्ष केले. वाघाने एक-एक करून मेंढ्या मारल्या आणि मग त्याने भोलावर झडप घातली. अशाप्रकारे भालाने आपले प्राण गमवले.

## २२. वाक्प्रचार

★ १. रमेश व मोहनचे भांडण झाले तेंव्हा सुचितने सहजपणे त्यातून अंग काढून घेतले.

२. चोरी करताना आपण पकडले जाणार हे मंदारला समजताच त्याने आकाशपाताळ एक केले.

३. बारावीची परीक्षा व आईचे आजारपण यामुळे मीनाला आकाश फाटल्यासारखे वाटले.

४. मनोहरच्या बढाई मारण्याच्या बोलण्याकडे राकेशने काना डोळा केला.

५. गमिनी काव्याचा वापर करून शिवाजींनी अनेक किल्ले काबीज केले.

६. शामल व कावेरीचे आपल्या विषयीचे बोलणे भक्तीच्या कानावर पडले.

७. बाबांना कामावर जाताना घड्याळ मिळत नाही म्हणून त्यांनी घर डोक्यावर घेतले.

८. अचानक केलेल्या हमल्यामुळे संभाजीराजे औरंगजेबकडे चतुर्भुज झाले.

९. परीक्षा संपून बराच वेळ झाला तरी केतन व केतकी घरी आले नाहीत; म्हणून आईचा जीव टांगणीला लागला.

१०. विराजच्या तोतरे बोलण्यावर त्याचे मित्र नेहमीच त्याच्या जखमेवर मीठ चोळत असे.

११. सावत्र आई असूनही सविता काकू गोदाला जिवापाड जपत असे.

१२. व्यवस्थित नियोजन न केल्यामुळे कामगारांच्या कष्टावर पालथ्या घागरीवर पाणी पडले.

१३. गरीब परिस्थितीमुळे आई-वडील पोटास चिमटा घेऊन आपल्या मुलांना शिकवत असतात.

१४. गृहपाठ पूर्ण न केल्यामुळे शिक्षकांना पाहताच विणाला ब्रम्हांड आठवले.

१५. आळशीपणामुळे कैलास नेहमी माशा मारत असे.

१६. मोहनच्या वारंवार गैरवर्तनामुळे थकलेल्या मित्रांनी त्याला वाऱ्यावर सोडले.

१७. धावण्याच्या स्पर्धेत प्रथम येण्याचा मनोहरने विडा उचलला होता.

१८. आई घरात नसताना आजोबांच्या हातावर तुरी देऊन सोहम खेळायला मैदानात गेला.

१९. अचानक मुलांच्या अपघाताची बातमी ऐकताच शामकाकांनी हंबरडा फोडला.

२०. नवीन चांगल्या पगाराची नोकरी मिळविण्यासाठी प्रतीक नेहमीच हातपाय हलवत असे.

२१. मुलाच्या खोटे बोलण्याच्या सवयीत सुधारणा करण्यात गजानन काका हतबल झाले.

२२. वंदना नेहमीच प्रत्येक गोष्टींची शहानिशा करूनच निर्णय घेत असे.

२३. कर्ज घेतल्यामुळे गावकरी सावकाराच्या ताटाखालचे मांजर झाले होते.

२४. जुळ्या मुलांना सांभळताना ताईच्या नाकी नऊ येत होते.

२५. क्रिकेटमध्ये रामच्या संघाने शामच्या संघाला पाणी पाजले.

## २३. विरामचिन्हे

★ १. श्रीयुत गंगाधर जोशी.

२. तो उद्यापर्यंत वस्तू बदलून देतो म्हणाला, तोवर आम्ही जाऊन येतो.

३. तुम्ही पुस्तक घेऊन दिलं नसतं तर?

४. पत्ता कशाला हवाय?

५. चहा, पोहे, कांदे-भजी